सकाळ
रत्नागिरी, रविवार, २३ नोव्हेंबर २०१४


# पुणे-रत्नागिरी सायक्लोथॉन यशस्वीपणे पूर्ण

## मुकुल माधव फाउंडेशन : फिनोलेक्सचे सहकार्य, आरोग्य तपासणी, सायकलींचे वाटप

**सकाळ वृत्तसेवा**

रत्नागिरी, ता. २२ : मुकुल माधव फाउंडेशनने पुणे ते रत्नागिरीपर्यंत सायक्लोथॉन यशस्वीपणे पूर्ण केली. फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या वतीने ३४० किलोमीटर्सच्या टप्प्यात आरोग्य शिबिरांचे आयोजन व सायकलींचे वाटप केले.

बायसिकल एंजल्सचे राकेश बक्षी व युकेमधील प्रख्यात ईएनटी सर्जन प्रो. राम धिल्लन या दोन व्यावसायिक सायकलपटूंनी हा प्रवास केला. याची सांगता शनिवारी सकाळी कोळंबे येथील मुकुल माधव विद्यालयात झाली.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय काळमपाटील, डॉ. अलिमियाँ परकार, फिनोलेक्सचे टी. के. काकडे, डॉ. आशुतोष मुळ्ये, योगेश सामंत, अभिषेक साळवी, मुकुल माधव विद्यालयाचे कर्मचारी व डॉक्टर्स उपस्थित होते.



**रत्नागिरी : फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाउंडेशनच्या सायक्लोथॉन सांगता कार्यक्रमात कोळंबे फाटा येथील मुकुल माधव विद्यालयात उपस्थित सायकलपटू राकेश बक्षी, प्रो. राम धिल्लन यांच्यासह विजय काळमपाटील डॉ. अलिमियाँ परकार, टी. के. काकडे, डॉ. आशुतोष मुळ्ये, योगेश सामंत, विद्यालयाचे कर्मचारी व डॉक्टर्स.**

फिनोलेक्स पाइप्सने १८ ते २२ नोव्हेंबर दरम्यान सायक्लोथॉनचे आयोजन केले होते. सीएसआर भागीदार असलेली पुण्यातील एनजीओ मुकुल माधव फाउंडेशनच्या साह्याने हा उपक्रम राबवण्यात आला. देशातील सर्वांत मोठा व्यावसायिक वाहन निर्मितीतील अशोक लेलँड आणि ना नफा तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या लाईव्हलीहूड सायकली पुरवणाऱ्या बायसिकल एंजल्सची मदत लाभली.

पुण्यापासून शिरवळ, उंब्रज, कोकरूड, पाली येथील जिल्हा परिषदेच्या शाळांत व गोळप येथील मुकुल विद्यालयातील मुलांकरिता आरोग्य शिबिर घेण्यात आले. यात ३० डॉक्टर सहभागी झाले होते. केईएम हॉस्पिटलमधील बालरोगतज्ज्ञ, भारती हॉस्पिटलमधील ऑडिओलॉजी, स्पीच व दंतरोगतज्ज्ञ, ससून हॉस्पिटल, हिंदुजा हॉस्पिटलमधील ईएनटी टीमच्या डॉक्टरांचा समावेश होता. त्यांनी २५०० मुलांची तपासणी केली.

पुण्यातील बालकल्याण संस्थेत १७ नोव्हेंबरला अपंग व्यक्तींना तीनचाकी सायकल देऊन सायक्लोथॉनचा प्रारंभ झाला. यावेळी दागिने बनवणाऱ्या एका लघुव्यवसायात नोकरी करणाऱ्या व्यक्तीला सायकल देण्यात आली. फिनोलेक्स पाइप्सच्या स्थानिक वितरकांनी खातरजमा केलेल्या ९ गरजूंना आज सायकलींचे वाटप करण्यात आले.

बायसिकल एंजल्सचे संस्थापक, चित्रपट निर्माता तथा 'द डायरेक्टर डायरीज'चे लेखक राकेश बक्षी यांनी मुंबईत ९३ हून अधिक बाईक्स व ३ व्हीलचेअर्स देणगी दिल्या. श्री. बक्षी म्हणाले, ''दररोज नोकरीधंद्याकरिता सायकलीवर प्रवास करणाऱ्यांना आपण पाहतो. तेव्हा त्यांच्या आयुष्यातील सायकलचे महत्त्वाचे स्थान आपल्याला कळतेच असे नाही. सायकलवरून दूध, अंडी किंवा चहा विकणाऱ्यांची उपजीविका पूर्णपणे सायकलवर अवलंबून असते.''

प्रा. धिल्लन हे युकेमध्ये ईएनटी स्पेशालिस्ट आहेत. मुकुल माधव फाउंडेशनच्या अनेक उपक्रमांत ते सहभागी झाले आहेत. धर्मादायासाठी सायकलिंगमधून आनंद व गरजूंना मदत करता शक्य आहे. प्रा. धिल्लन म्हणाले, ''लोकांच्या स्वप्नांची पूर्तता करण्याकरिता आवश्यक असलेले माध्यम मिळत असल्याने मला सायकलींचे वाटप करण्याची कल्पना खूप भावली. त्यानंतर स्वप्नपूर्ती करण्याचे त्या-त्या व्यक्तीवर अवलंबून असते.''

### दरवर्षी सायक्लोथॉनचे आयोजन : छाब्रिया

या उपक्रमाबाबत फिनोलेक्स कंपनीच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया म्हणाल्या, ''फाउंडेशन बरीच वर्षे रत्नागिरीतील शाळांसह कार्यरत आहे. दरवर्षी एका शाळेला यात समाविष्ट करते. सायक्लोथॉन हा वार्षिक आयोजनांमधील आणखी एक उपक्रम आहे. सायक्लोथॉनला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हा उपक्रम आता दरवर्षी साजरा केला जाईल व उत्तरोत्तर यशस्वी होत राहील.''

सागर 23/11/2014
पान नं. 12

# पुणे-रत्नागिरी ३४० कि.मी.च्या सायक्लोथॉनची रत्नागिरीत सांगता

## ९ गरजूंना सायकलींचे वाटप; मुकुल माधव फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**रत्नागिरी :- मुकुल माधव फाऊंडेशन, फिनोलेक्स पाईप्स आयोजित व अशोक लेलँड कंपनी पुरस्कृत, पुणे ते रत्नागिरी या ३४० कि.मी.अंतराच्या सायक्लोथॉन २०१४ ची काल दि.२२ नोव्हेंबर रोजी रत्नागिरी तालुक्यातील कोळंबेफाटा येथील मुकुल माधव विद्यालयामध्ये सांगता झाली. यावेळी नऊ गरजू व्यक्तींना सायकलींचे वाटप करण्यात आले.**

फिनोलेक्स कंपनी, मुकुल माधव फाऊंडेशन, सीएसआर, अशोक लेलँड, बायसिकल एंजल्स यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सायक्लोथॉनचा प्रारंभ दि.१८ नोव्हेंबर रोजी पुणे येथून झाला. पुणे येथील एका अपंग व्यक्तीला ट्रायसिकल आणि शरीर व्यापारातून बचावलेल्या व सध्या दागिने बनविणाऱ्या एका लघुव्यवसायामध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तीला सायकल देऊन या सायक्लोथॉनचा प्रारंभ झाला. बायसिकल एंजल्सचे राकेश बक्षी आणि युनायटेड किंगडममधील प्रसिध्द कान, नाक, घसातज्ज्ञ प्रोफेसर राम धिल्लन यांनी पुणे ते रत्नागिरी हा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला. पुणे ते रत्नागिरी या प्रवासादरम्यान शिरवळ, उंब्रज, कोकरुड, पाली येथे तसेच गोळप येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांसाठी आरोग्य शिबिरेहि घेण्यात आली. या शिबिरात ३० डॉक्टरांचे पथक सहभागी झाले होते. केईएम हॉस्पिटलमधील पेडियाट्रीक टीम, भारतीय हॉस्पिटलमधील ऑडिओलॉजी अँड स्पीच तसेच डेन्टल टीम, ससुन हॉस्पिटल, हिंदुजा हॉस्पिटल, मुंबईतील इएनटी स्पेशालिट यांचा यात समावेश होता. या डॉक्टरांनी सुमारे अडीच हजार मुलांची तपासणी केली.



सायक्लोथॉन २०१४च्या सांगता समारंभात सहभागी झालेले राकेश बक्षी, प्रोफेसर राम धिल्लन, श्री.काकडे, श्री.सामंत, डॉ.अलिमियाँ परकार आणि शिक्षकवृंद

### कोणतेहि वाहन डाव्या बाजूनेच चालवा

मुलांना डाव्या बाजूने सायकल चालविण्याची सवय पालकांनी लावली पाहिजे. सायक्लोथॉनमध्ये पुणे ते रत्नागिरी असा प्रवास करताना अनेक ठिकाणी रस्त्याच्या उजव्या बाजूने सायकल चालविताना अनेकजण आढळले. हे पूर्णत: चुकीचे आहे. यामुळे अपघात होऊन दुर्घटना घडण्याची भीती असते. उजव्या बाजूने सायकल चालविणारी मुले भविष्यात हातात बाईक व चारचाकी गाडी आल्यास तीहि उजव्या बाजूने चालविण्याचा धोका संभवतो. हे टाळण्यासाठी लहानपणीच सायकल डाव्या बाजूने चालविण्याची सवय लागणे आवश्यक आहे असे मत राकेश बक्षी यांनी व्यक्त केले.

### कानातील मळ काढण्यासाठी बडस् वापरु नका

३४० कि.मी.प्रवासादरम्यान ज्या ज्याठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली होती त्या त्याठिकाणी विद्यार्थ्यांच्या कानात मळ असल्याचे तपासणीअंती दिसून आले. काही पालक आपल्यासह मुलांच्या कानात बडस् घालून कानातील हा मळ काढण्याचा प्रयत्न करतात. परंतु या बडसमुळे हा मळ बाहेर येण्याऐवजी अधिक आत जातो. त्यामुळे कानाचे आजार उद्भवतात. म्हणून मळ काढण्यासाठी बडसचा वापर टाळावा असे आवाहन युकेतील प्रसिध्द ईएनटी स्पेशालिस्ट प्रोफेसर राम धिल्लन यांनी यावेळी केले.

बायसिकल एंजल्सचे संस्थापक, फिल्ममेकर आणि द डायरेक्टर डायरीजचे लेखक राकेश बक्षी यांनी मुंबईमध्ये ९३ हून जास्त बाईक्स आणि तीन व्हील चेअर्सचे वाटप केले आहे. सायकल चालविल्याने आपले शरीर तंदुरुस्त राहते. तसेच सायकलहि चरितार्थाचे महत्वाचे साधन असल्याने त्याचे महत्व ज्याची उपजिविका सायकलवर अवलंबून आहे त्यांनाच ती कळते असे श्री.बक्षी यांनी यावेळी सांगितले. प्रो.राम धिल्लन यांनी सांगितले की सायकलिंगमधून आनंद मिळविणे आणि गरजूंना मदत करण्याच्या इच्छेची पुर्तता करणे अशा दोन्ही गोष्टी साध्य करता येतात.

या उपक्रमामागील संकल्पना समजावून सांगताना फाऊंडेशनच्या प्रमुख श्रीमती रितु छाब्रिया म्हणाल्या सायक्लोथॉन हा वार्षिक आयोजनामधील एक उपक्रम आहे. सायक्लोथॉनला मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हा उपक्रम आता दरवर्षी साजरा केला जाईल.

पुढारी 23/11/2014
पान नं. 5

# मुकुल माधव फाऊंडेशनची सायक्लोथॉन यशस्वी

रत्नागिरी : पुढारीवृत्तसेवा

पाईप्सचे निर्माण करणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या फिनोलेक्स पाईप्सने १८ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीमध्ये आपली सीएसआर भागिदारअसलेली१९९९पासूनकार्यरत पुणेस्थित एनजीओ असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनच्या सहाय्याने आणि लाईव्हलिहूड सायकली पुरवणाऱ्या बायसिकल एंजल्स या सामाजिक उपक्रमाच्या संयुक्त विद्यमाने पुणे ते रत्नागिरी सायक्लेथॉनचे आयोजन केले होते.




रत्नागिरी : मुकुल माधव फाऊंडेशनच्या पुणे ते रत्नागिरी सायक्लोथॉनमध्ये सहभागी झालेले ३० वैद्यकीय अधिकारी व मान्यवर.

बायसिकल एंजल्सचे राकेश बक्षी आणि प्रोफे. राम धिल्लन (युक्रेनमधील विख्यात ईएनटी सर्जन) या दोन व्यावसायिक सायकलपटूंनी मुकुल माधव फाऊंडेशनच्या सोबतीने हा प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला.

या उपक्रमादरम्यान पार केल्या. टापूमध्ये गरजूंना सायकलींचे वाटप करण्यात आले आणि शिरवळ, उंब्रज, कोकरुड, पाली येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आणि गोळप, रत्नागिरी येथील मुकुल माधव फाऊंडेशनच्या मुकुल माधव विद्यालयामध्ये मुलांकरीता आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या आरोग्य शिबिरामध्ये ३० डॉक्टर सहभागी झाले होते. त्यामध्ये केईएम हॉस्पिटलमधील पेडियाट्रीक टीम, भारती हॉस्पिटलमधील ऑडिओलॉजी अँड स्पीच तसेच डेन्टल टीम आणि ससून हॉस्पिटल पुणे आणि हिंदुजा हॉस्पिटल, मुंबईमधील ईएनटी टीम यांचा समावेश होता. या डॉक्टरांनी जवळपास २५०० मुलांची तपासणी केली.

दि. १७ नोव्हेंबर २०१४ला बालकल्याण संस्था, पुणे येथील एक अपंग व्यक्तीला ट्रायसिकल आणि शरीर व्यापारातून बचावलेल्या आणि सध्या दागिने बनवणाऱ्या एका लघु व्यवसायामध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तीला सायकल देऊन या सायक्लेथॉनचा आरंभ करण्यात आला होता. या उपक्रमासाठी अशोक लेलँड आणि लाईव्हलिहूड यांचे सहकार्य लाभले.

तरुण भारत 23/11/2014
पान नं. ४

# 'फिनोलेक्स'च्या सायक्लोथॉनचा समारोप

## दोन व्यावसायिक सायकलपटूंचा ३४० कि.मी. प्रवास; गरजूंना सायकलींचे वाटप, विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबीर



रत्नागिरी : पूणे ते रत्नागिरी असा सायकल प्रवास करणारे राकेश बक्षी व राम धिल्लन. सोबत पुरस्कर्ते व सहकारी.

प्रतिनिधी
रत्नागिरी

उपेक्षित वर्गातील व्यक्तींना सायकल पुरवून त्यांच्या उदरनिर्वाहात साह्यय्य करणे या उद्देशाने आयोजित केलेले पुणे ते रत्नागिरी असे ३४० कि.मी. सायक्लोथॉन यशस्वीपणे पूर्ण करण्यात आले. यामध्ये ९ गरजूंना सायकल वाटप करण्यात आले तर मार्गावरील ४ शाळांमध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. २ सायकलपटू यात सहभागी झाले होते.

पाईप्सचे निर्माण करणाऱ्या भारतातील आघाडीची कंपनी असणाऱ्या फिनोलेक्स पाईप्सने आपल्या सीएसआर भागिदार असणाऱ्या मुकुल माधव फाऊंडेशन आणि वाहनांचे निर्माण क्षेत्रातील आघाडीच्या अशोक लेलँड आणि ना नफा तत्वावर चालवल्या जाणाऱ्या आणि उपजिवीकेकरिता सायकली पुरवणाऱ्या बायसिकल एंजल्स या सामाजिक उपक्रमांच्या संयुक्त विद्यमाने १८ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत याचे आयोजन करण्यात आले होते. पूण्यामध्ये बाल कल्याण संस्थेतील एका अपंग व्यक्तीला ट्रायसिकल आणि लघू व्यवसायामध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तीला सायकल देऊन सायक्लोथॉनचा प्रारंभ करण्यात आला. शनिवारी मुकुल माधव विद्यालयामध्ये याचा समारोप करण्यात आला.

मुकुल माधव फाऊंडेशनचा हा उपक्रम असून फिनोलेक्स पाईप्सने त्याला आपल्या सीएसआर उपक्रमांचा एक भाग म्हणून पुरस्कृत केले आहे. प्रवास पुरस्कर्ता म्हणून अशोक लेलँडने या उपक्रमाला पुरस्कत केले. बायसिकल एंजल्सचे राकेश बक्षी आणि युक्रेनमधील विख्यात ईनटी सर्जन प्रा. राम धिल्लन या दोन व्यावसायिक सायकलपटूंनी मुकुल माधव फाऊंडेशनच्या सोबतीने हा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला.

या उपक्रमादरम्यान फिनोलेक्सच्या स्थानिक डिलर्सनी खातरजमा केलेल्या ९ गरजूंना सायकलींचे वाटप करण्यात आले. शिरवळ, उंब्रज, कोकरूड, पाली येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आणि गोळप येथील मुकुल माधव फाऊंडेशनच्या मुकुल माधव विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शाळांमधील सुमारे २५०० मुलांची यामध्ये तपासणी करण्यात आली. यामध्ये ३० डॉक्टर सहभागी झाले होते. यामध्ये केईम हॉस्पिटलमधील पेडियाट्रिक टीम, भारती हॉस्पिटलमधील ऑडिऑलॉजी अँड स्पीच तसेच डेन्टल टीम आणि ससून हॉस्पिटल, पूणे आणि हिंदूजा हॉस्पिटल, मुंबईमधील ईनटी टीम यांचा समावेश होता.

या उपक्रमामागील संकल्पना सांगताना रितू छाब्रिया म्हणाल्या, फाऊंडेशन बरीच वर्षे रत्नागिरीतील शाळांसह कार्यरत आहे आंणि दरवर्षी एका शाळेला यामध्ये समाविष्ट करते. सायक्लोथॉन हा वार्षिक आयोजनांमधील आणखी एक उपक्रम आहे. सायक्लोथॉनला मिळालेल्या प्रतिसादामुळे हा उपक्रम दरवर्षी साजरा केला जाईल. सायक्लोथॉनमधील एक सायकलस्वार बायसिकल एंजल्सचे संस्थापक , फिल्म मेकर आणि 'द डायरेक्ट डायरीज' चे लेखक तसेच प्रसिद्ध संगीतकार आनंद बक्षी यांचे पूत्र राकेश बक्षी यांनी मुंबईमध्ये ९३ हून जास्त बाईक्स आणि ३ व्हीलचेअर्सचे दान म्हणून वाटप केले आहे. ते म्हणाले दररोज नोकरी, धंद्यासाठी सायकलीवर प्रवास करणाऱ्या माणसाला आपण पाहतो, तेव्हा त्याच्या आयुष्यातील सायकलीचे महत्वाचे स्थान आपल्याला कळतेचे असे नाही. सायकलीवरून दूध विकणाऱ्या, चहा विकणाऱ्या माणसाचे आयुष्य, त्याची उपजिवीका पूर्णपणे त्याच्या सायकलीवर अवलंबून असते. दुसरे सायकलस्वार राम धिल्लन हे युक्रेनमधील ईनटी सर्जन म्हणून ओळखले जातात. मुकुल माधवच्या अनेक उपक्रमांमध्ये ते सहभाग घेतला आहे. ते म्हणतात पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेले माध्यम मिळत असल्याने मला सायकलींचे वाटप करण्याची कल्पना खूप भावली.

**राकेश बक्षी व राम धिल्लन या व्यावसायिक सायकलपटूंचा सहभाग.**

# फिनोलेक्सनं आणल्या सायकली!

## गरजूंना सायकल वाटप ● मुकुल माधव फाऊंडेशनच्या सहकार्याने पुणे-रत्नागिरी सायकल दौड ● २५०० विद्यार्थ्यांची तपासणी

▶ रत्नागिरी *(शहर वार्ताहर)*

पाईप्सचे निर्माण करणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या फिनोलेक्स पाईप्सने १८ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीमध्ये आपली सीएसआर भागीदार संस्था मुकुल माधव फाऊंडेशनच्या सहाय्याने आणि व्यावसायिक वाहनांचे निर्माण करणाऱ्या अशोक लेलँड, ना-नफा तत्त्वावर चालवल्या जाणाऱ्या आणि लाईव्हलिहूड (उपजीविकेकरिता) सायकली पुरवणाऱ्या बायसिकल एंजल्स या सामाजिक उपक्रमाच्या वतीने पुणे-रत्नागिरी सायकल दौडीचे आयोजन केले होते.



हा कार्यक्रम मुकुल माधव फाऊंडेशनचा उपक्रम असून फिनोलेक्स पाईप्सने त्याला आपल्या सामाजिक बांधिलकीतील उपक्रमांचा एक भाग म्हणून पुरस्कृत केले होते. प्रवास पुरस्कर्ता म्हणून अशोक लेलँडने या उपक्रमाला पुरस्कृत केले होते. बायसिकल एंजल्सचे राकेश बक्षी आणि प्रोफेसर राम धिल्लन (युक्रेमधील विख्यात कान, नाक घसारोग चिकित्सक) या दोन व्यावसायिक सायकलपटूंनी मुकुल माधव फाऊंडेशनच्या सोबतीने हा प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला.

पुण्यातून १८ नोव्हेंबरला सुरू झालेल्या सायकल दौडीची सांगता २२ रोजी रत्नागिरीत गोळप येथे झाली. सायकल दौडीच्या प्रवासात गरजूंना त्यांची निकड तपासून सायकलींचे वाटप करण्यात आले आणि शिरवळ उंब्रज, कोकरूड, पाली येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आणि गोळप, रत्नागिरी येथील मुकुल माधव फाऊंडेशनच्या मुकुल माधव विद्यालयामध्ये मुलांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. सायकल दौडीदरम्यान आयोजित आरोग्य शिबिरांमध्ये ३० डॉक्टर सहभागी झाले होते. त्यामध्ये केईएम रूग्णालयामधील पेडियाट्रीक पथक, भारती हॉस्पिटलमधील ऑडिओलॉजी अँड स्पिच तसेच डेन्टल टीम आणि ससून हॉस्पिटल, पुणे आणि हिंदुजा हॉस्पिटल, मुंबईमधील ईएनटी टीमचा समावेश होता. या डॉक्टरांनी सायकल दौडीतील त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी जवळपास २५०० मुलांची तपासणी केली. राकेश बक्षी आणि प्रोफे. राम धिल्लन यांनी या उपक्रमात झोकून देत घेतलेल्या मेहनतीबद्दल आणि समाजासाठी काहीतरी करायचंय यासाठीच्या त्यांच्या धडपडीचे दौडीदरम्यानच्या त्यांच्या शिबिराच्या ठिकाणी ग्रामस्थ पालकांकडून कौतुक करण्यात आले. १७ नोव्हेंबर रोजी बालकल्याण संस्था, पुणे या लघु व्यवसायामध्ये नोकरी गरजू व्यक्तींना सायकल वाटप करून सायकल दौडीने रत्नागिरीच्या दिशेने प्रस्थान केले.

**Daily SAKAL dated 23/11/2014**

# PUNE-RATNAGIRI CYCLOTHON SUCCESSFULLY COMPLETE

## MUKUL MADHAV FOUNDATION: COOPERATION FROM FINOLEX, HEALTH CHECK-UP, DISTRIBUTION OF BICYCLES

Mukul Madhav Foundation completed the cyclothon from Pune to Ratnagiri. Within the distance of 340 Kms, health check-up camps and distribution of bicycles was organized by Finolex.

Two professional cyclists Rakesh Bakshi of Bicycle Angles and renowned ENT surgeon Prof.Ram Dhillan travelled from Pune to Ratnagiri. The concluding programme was arranged on Saturday morning at Mukul Madhav Foundation at Kolambe.

CEO of ZP Ratnagiri Vijay Kalampatil, Dr Alimia Parkar, T K Kakade, Dr Ashutosh Mulye, Yogesh Samant & Abhishek Salvi of Finolex, staff of Mukul Madhav Vidyalaya and doctors were present on the occasion.

Finolex Pipes had organized the cyclothon during 18th to 22nd November. The programme was organized with the help of their CSR partner, an NGO in Pune Mukul Madhav Foundation. Ashok Leyland, the largest commercial vehicle producer in the country and Bicycle Angles, a company supplying livelihood cycles on no profit no loss basis, helped in organizing the above programme.

Health Check-up camps were organized for the students in various ZP schools at Pune, Shirval, Umbraj, Kokrud, Pali and at Mukul Madhav Vidyalaya, Golap, Ratnagiri. 30 doctors participated in these health camps. Children specialist from KEM hospital, Audiologist, Speech & Dental specialist from Bharati Hospital, and a team of doctors from Sassoon & Hinduja Hospital took part in the health camp. 2500 children were examined.

The cyclothon was started with donation of a 3-wheeler cycle to a handicapped person on 17th November. 9 needy people recommended by the local pipes distributors were given the cycles on 22nd Nov.

The founder of Bicycle Angles Rakesh Bakshi has donated more than 93 biccles and 3-wheelers in Mumbai. He said, subsistence of many of the milk distributors, eggs or tea salesmen are dependent on bicycles.

Prof. Dhillan is an ENT specialist. He has participated in many programmes of Mukul Madhav Foundation. He said, with the help of cycling many of the needy people can be helped and he liked the idea of distribution of cycles to help needy people.

**(Similar news has appeared in Prahar, Tarun Bharat, Pudhari and Sagar today)**